प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com



स्वराज्य महिला प्रभाग संघाच्या सभेत सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करताना आळे महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# विद्यार्थ्यांकडून महिलांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

**आळेफाटा : पुढारी वृत्तसेवा**

आळे (ता. जुन्नर) येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी क्विक हिल फाउंडेशनच्या माध्यमातून सायबर जागरूकता अभियानांतर्गत स्वराज्य महिला प्रभाग संघ राजुरी-बेल्हे यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले.

बेल्हे, गुंजाळवाडी येथील स्वामी कृपा लॉन्स येथे स्वराज्य महिला संघाच्या वार्षिक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी ओटीपी, कर्ज, बँकेतील व्यवहार याबाबत होणाऱ्या फसवणुकीबाबत माहिती दिली. तसेच कोणती खबरदारी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. आर्थिक फसवणुकीबाबत नाट्यप्रयोग सादर करत महिलांना सायबर सुरक्षेबाबत शपथ दिली. या वेळी विद्यार्थ्यांच्या हातात सायबर सुरक्षेचे पोस्टर्स होते. संघाच्या अध्यक्षा हेमलता शिंदे, सचिव स्नेहा बांगर, कोषाध्यक्षा वर्षा गुंजाळ व पदाधिकाऱ्यांनी आळे महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागप्रमुख नूतन जोशी व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष पांडुरंग पवार उपस्थित होते.

ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सौरभ डोके, सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, संचालक किशोर कुऱ्हाडे, भाऊशेठ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबुशेठ कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.